
# ग्रीसच्या ख्रिस्ती लोकांनी यरूशलेमेतील ख्रिस्ती लोकांना मदतीचा हात दिला

लोकांच्या गरजा पुरविण्यासाठी मदत करण्यास मुलांना शिकवा



**प्रार्थना:** "प्रिय प्रभु गरजू लोकांना मदत करण्यासाठी आम्ही एकत्रितपणे काम करतो तेव्हा आम्ही सूज्ञपणे व उदारपणे ते करावे याकरीता साहाय्य कर"

मुलांचे वयोगट व गरजा यानुसार शेक्षणिक कार्यक्रमांची निवड करा.

करिंथकरांनी ख्रिस्तामधील भाऊ व बहिणींना कशा प्रकारे मदत केली हे मोठया मुलाने किंवा शिक्षकांनी सांगवे

**पार्श्वभूमी:** यरूशलेमेतील विश्वासणारे दुष्काळामुळे उपासमारीच्या संकटाचा सामना करीत आहेत ही बातमी पौलाच्या कानावर गेली तेव्हा तो मिशनरी म्हणून सेवा करीत होता. ह्या लोकांना मदत करण्याची विनंती त्याने इतर देशांतील विश्वासणाऱ्यांना केली. त्यांचा दान देण्याचा हा प्रकल्प मोठा होता आणि बऱ्याच मंडळया काही दिवसांपासून यासाठी पैसे गोळा करीत होत्या हा जमा केलेला पैसा यरूशलेमेतील उपासमारीचा सामना करणाऱ्यी ख्रिस्ती लोकांपर्यन्त व्यवास्थित पोचावा यासाठी त्यांनी तो योग्य लोकांच्या हाती सोपण्याची खबरदारी घेतली.

**1 करिंथ 16:1-4** वाचा किंवा सांगा करिंथकरांनी त्यांचे दान कशा प्रकारे गोळा करावे याविषयी प्रेषित पौलाने त्यांना काय कळवले मग विचारा:

- करिंथ व्यतिरिक्त इतर मंडळयांनी गरीबांना काय दिले? (उत्तर: पाहा वचन 1)
- विश्वासणाऱ्यांनी त्यांचे दान कसे जमा केले? (वचन 2)
- लोकांनी त्यांचे दान एकाच वेळी आणून दिले का? (वचन 2)
- पैसा कसा पाठवला जातो याकडे मंडळीने बारकाईने कसे लक्ष पुरवले (वचन 3)
- पौलाच्या मते हे दान किती महत्त्वाचे होते? (वचन 4 पौल नव्या मंडळयांची स्थापना करण्याच्या कामात व्यस्त होता, परंतु त्याच वेळी त्याला यरूशलेमेतील संकटात सापडलेल्यांचीही आठवण होती म्हणूनच दानाची योग्य व्यवस्था होते की नाही याकडे त्याने वेळात वेळ काढून लक्ष दिले)

दान देण्याच्या आपल्या विनंतीला लोकांनी कसा प्रतिसाद दिला याबदल पौलाने करिंथकरांना लिहिले ते स्पष्ट करा:

- किती विश्वासणाऱ्यांनी उदारहस्ते संतोषाने दान दिले याविषयी पौलाने त्यांना दुसरे पत्र लिहून कळवले (2 करिंथ 8 वचने 1-7,10-11 व 19-21)
- ग्रीसच्या उत्तरेला मासेदोनिया नावाचा छोटासा देश आहे. तेथील अत्यंत गरीब विश्वासणाऱ्यांनी ही अतिशय त्यागपूर्वक दान दिले.
- गरीब मासेदोनिया वासीयांनी दान देऊ देण्याची आग्रहाची विनंती प्रेषितांकडे केली.
- करिंथकरांनी प्रत्येक आठवडयात थोडे थोडे दिले आणि प्रेषितांना ते नेता यावे यासाठी बाजूला ठेवले.
- त्यांचे दान यरूशलेममध्ये योग्य ठिकाणी पोचवण्यासाठी विश्वासू माणसाचे नाव सुचवण्यास पौलाने सांगितले, यामुळे कोणत्याच शंकेला वाव राहिला नसता.
- उपासमारीचा सामना करणाऱ्यांना जेवण देणे एवढाच नाही तर देवाचे गौरव करणे हाही दान देण्यामागचा हेतू होता.

"महान देणगी" ह्या कथावृत्तांत्ताचे **नाट्यीकरण करा.** मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.

- मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्यांशी बोलून व्यवस्था करा. **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी **निवेदकि, पौल, तीत** आणि **शत्रू** ह्या भूमिका कराव्यात निवेदकाने कथावृत्तांत्ताचा सारांश तयार करून मुलांकडून संवाद पाठ करून ध्यावेत.
- **लहान मुलांनी गरीब लोक, करिंथकर** आणि **मासेदोनियावासी** ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदकः** कथावृत्तांत्ताचा पहिला भाग सांगा (पौल 1 करिंथ 16:1-4 मध्ये काय लिहितो) मग म्हणा, " यरूशलेमेमधील गरीब लोक काय म्हणतात ते ऐका."

**गरीब लोकः** "आमची पिके गेली" वर्षभरातच आपण उपासमारीने मरून जाऊ" "देवच आपली मदत करील!"

**निवेदकः** "दरम्याम तिकडे दूर करिंथमध्ये पौल ख्रिस्ती लोकांना काय सांगतो ते ऐका."

**पौलः** "यरूशलेम मधील उपासमारीचा सामना करणाऱ्यांना आपण मदत केली पाहिजे दर आठवडयात थोडी रक्कम बाजूला ठेवा आणि प्रत्येक रविवारी ती दानार्पणात टाका काही काळांनंतर मी येऊन ते दान घेऊन जाईन."

**निवेदकः** "ख्रिस्ताचा शत्रू आपल्या मदतनीस भूतावळीला काय सांगतो ते ऐका."

**शत्रूः** "नाही, नाही! ह्या मंडळया सहकार्य करीत आहेत! आपण भुतांनी त्यांना एकत्र काम करू देता कामा नये! ते एकमेकांना मदत करीत आहेत आणि पुष्कळ दान देत आहेत! आपण त्यांना नाऊमेद केले पाहिजे"

**करिंथकरः** दान जमा करण्याचे पात्र सर्वत्र फिरवा आणि म्हणा, "प्रत्येक आठवडयात आपल्याला थोडी मदत करता येते याबद्दल मला आनंद वाटतो!" "मी कोंबडयापासून मिळणाऱ्या अंडयांतून रोज एक अंडे बाजूला काढून ठेवले आणि ती अंडी विकली त्याचे हे पैसे दान म्हणून आणले आहेत." "मी काही शाली तयार करून त्या विकल्या."

**शत्रूः** रागाने पाय आपटत म्हणा, "त्यांनी एकाच वेळी मोठी रक्कम दान म्हणून देण्यास भाग पाडण्यात आपण अपयशी ठरलो म्हणून आता आपण त्यांना पैशाचा गैरव्यवहार करण्याच्या मोहात पाडू या हे दान घेऊन यरूशलेमेमध्ये गेलेल्या व्यक्तींबद्दल मी संशय निर्माण करतो ते यातून काही चोरून घेतील!"

**करिंथकरः** दोघा जाणांकडे बोट दाखवून म्हणा, " तुम्ही दोघे जण पैशाचा व्यवहार पाहा, "तुम्ही हे पैसे घेऊन त्यांच्याकडे जा आमचा तुमच्यावर भरंवसा आहे," "आम्ही दिलेल्या प्रत्येक गोष्टीचा कृपा करून हिशेब ठेवा!"

**निवेदकः** कथावृत्तांत्ताचा दुसरा भाग सांगून म्हणा, "पुढे बऱ्याच काळाने पौलाने मासेदोनियाला भेट दिली मासेदोनियावासीयांनी त्याला काय सांगितले ते ऐका."

**मासेदोनियावासीः** "पौल भाऊ, यरूशलेमेमधील आमचे भाऊ बहिणी उपासमारीच्या संकटाचा सामना करीत आहेत."

"आम्ही गरीब आहोत पण आम्हांला त्यांना मदत करायची आहे."

"करिंथकरांप्रमाणे आम्हांलाही महान दानासाठी दान देण्याची परवानगी द्या."

**पौलः** " तुमचा त्याग व उदारपणा देव आशीर्वादित करो. तुमचे दान जमा करण्यासाठी मी तीताला पाठवीन"

**निवेदकः** "तीतानेही करिंथरांची भेट धेतली तो काय म्हणाला ते ऐका,"

**तीतः** "सर्व मंडळयांनी एकत्र येऊन सुरू केलेला महान प्रकल्प पूर्ण करण्यास तुम्हांला आनंद वाटेल. मी इतर विश्वासू बंधूजना समवेत दान घेण्यासाठी आलो आहे. माझ्या बरोबर हे पैसे यरूशलेमेला धेऊन

जाण्यासाठी तुमची माणसे तयार आहेत का?"

**करिंथकर:** "यरूशलेमेतील लोकांना मदत करण्याची आमची इच्छा आहे." "ह्या दोघांवर आमचा भरंवसा आहे. ते तुमच्या बरोबर येतील." (गरीब लोकांकडे जाऊन त्यांना दान द्या.)

**गरीब लोक:** "देवाचे उपकार मानतो! आता आम्ही उपासमारीने मरणार नाही!"

**शत्रू:** आपण अपयशी ठरलो! शंकेला जागा राहू नये म्हणून त्यांनी मोठया सूज्ञतेने पैसे हाताळले. मी परत प्रयत्न करीन!"

**निवेदक:** मदत करणाऱ्यांचे आभार माना.

या अभ्यासाच्या आरंभी दिलेले प्रश्नच मुलांनी मोठया माणसांना विचारावेत.

**चर्चा करा:** मंडळयांना एकत्र येऊन देवाच्या सेवेसाठी करता येतील अशा इतर प्रकल्पांची उदाहरणे सांगा.

मोठया मुलांनी "जमा" आणि "खर्च" असे रकाने असलेले हिशेबाचे पुस्तक आखावे.

- 'जमा' रकान्यामध्ये गरीबांना पैसे देण्यासाठी त्यांना कोणत्या गोष्टीची विक्री करता येईल त्याची यादी लिहावी
- 'खर्च' रकान्यामध्ये खरेदी करून गरीबांना देता येतील अशा वस्तूंची यादी लिहावी.

लहान मुलांनी नाणे हातात धरलेले आहे असे चित्र काढावे (वर दिलेले चित्र पाहा.)

- मंडळयांना सूज्ञपणे एकत्र येऊन अत्यंत गरजू लोकांना उदारपणे कशी मदत करता येते ते ह्या चित्रावरून दिसते हे मुलांनी उपासनेच्या वेळी मोठया माणसांना सांगावे.

**पाठ करा. 1 करिंथ 9:6**

**कविता** चार मुलांनी नीतिसूत्रे 24:3-6 ह्यातील एकेक वचन म्हणायला सांगा.

**प्रार्थना:** "प्रिय प्रभू तू आम्हांला खूप चांगल्या चांगल्या गोष्टी दिल्या आहेत. गरजूंना आणि तुझे वचन अगदी दूरवरच्या ठिकाणी घेऊन जाणाऱ्यांना मदत करण्याची आमची इच्छा आहे. आमच्या धनसंपत्तीने आम्ही एकत्र काम करून तुझे गौरव करण्यासाठी आमची मदत कर."

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net